# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी
दिनांक:- १७/०१/२०२५.

**<u>भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेणाऱ्यावर केलेली कारवाई.</u>**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे टेमघर नं. स. ५/३, ५/५ व स.नं. ९/१४ भिवंडी या ठिकाणी, टेमघर, पाहणी केली असता त्याठिकाणी विकासक श्री. हरेश तुकाराम पाटील व इतर-१ यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून मानपाचा जल वाहिनीला छिद्र पाडून १ इंच व्यासाची एक पाईप लाईन तळ अधिक सात मजली इमारतीकरीता अनधिकृतपणे घेतली असल्याने पाण्याची चोरी (व्यापारी १ = रु. ७८,००० x ५ वर्षे) रु. ३,९०,०००/-रस्त्याचे नुकसान (३३६ रनिंग मी. x २०० रु. प्रती मिटर) रु. ७७,२००/- पाईप लाईनचे नुकसान (रु. १९००/- x ५.५ मी) रु. १०,४५०/- असे एकूण रु. ४,६७,६५०/- (अक्षरी रुपये चार लक्ष सदुसष्ट हजार सहाशे पन्नास मात्र)* नुकसान केल्यामुळे त्यांचे विरुद्ध शांतीनगर पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३२४(४), ३२४(५), ३२६(b) व ३२६(g) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता श्री उद्धव गावडे यांचे अधिपत्याखाली श्री विराज भोईर (पथक प्रमुख), श्री. नफीस मोमीन, सहाय्यक पथक प्रमुख, यांचे मार्फत करण्यात आली.

श्रीकांत परदेशी
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका